# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### मंगळवार, दिनांक ०२ जुलै, २०२४/ आषाढ ११, १९४६ (शके)

५४. महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ (३) अन्वये मंगळवार, दिनांक ०२ जुलै, २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता **श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव यांचे दालन क्रमांक १४०४-ड, चौदावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे संगणकीय आज्ञावलीद्वारे अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम काढण्यात आला आहे. निदेशानुसार सदरहु ठराव **शुक्रवार, दिनांक ०५ जुलै, २०२४ रोजी** खालीलप्रमाणे चर्चेला घेण्यात येणार आहेत :-

**(मंगळवार, दिनांक ०२ जुलै, २०२४ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) -**

(१) **डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६०**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण झालेले नाही, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागत आहे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण झाली आहे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२) **डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३३**

"राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठिकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(3) **श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६८**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील बेरोजगारांना रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस हि विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(४) श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७२**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(५) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६१**

"राज्यात मुंबईसह इतर शहरांतील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेणाऱ्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तदनुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरिता राज्य शासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ०२ जुलै, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१)(कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य
२) मा.उप सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव (१)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव (२)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
७) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, विधान भवन, मुंबई
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
९) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
१०) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)